# नि.दि.दा. क्र. १२१/२०१९ मधील नि. क्र.४४ वरील आदेश.

## संपत डिंबळे वि. पांडुरंग भोईटे

(दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी पारीत)

१. प्रस्तुत अर्ज हा वादीतर्फे नागरी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ अन्वये दाखल करण्यात आलेला असून, दिनांक ०३/०३/२०२० रोजी दाखल करण्यात आलेल्या साक्षीदारांच्या प्रतिज्ञापत्रांना न्यायालयीन निशाणी देण्याबाबतचा आहे. वादीने प्रतिवादीविरुद्ध प्रस्तुतचा दावा ठराव, कायमस्वरूपी मनाई व खरेदीखत रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. सदर खरेदीखत क्रमांक ११७१/१९९५ दिनांक ०३/०८/१९९५ हा वादीने प्रतिवादीकडून घेतलेल्या हातउसणे रकमेच्या बदल्यात तारण म्हणून लिहून दिल्याचा दावा वादीने केला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने वादीने दिनांक ०३/०३/२०२० रोजी मौजे शिवरे येथील पाच साक्षीदार नामे श्री. सूर्यकांत बाजीराव पायगुडे, श्री. एकनाथ खंडू इंगुळकर, सौ. रुक्मिणी दत्तात्रय पवार, श्री. अंकुश सर्जेराव डिंबळे व श्री. प्रकाश तुकाराम जाधव इत्यादींची प्रतिज्ञापत्रे न्यायालयात दाखल केली होती. हे सर्व गावातील व संबंधित प्रकरणाची माहिती असलेले शेतकरी आहेत. मात्र, संबंधित कारकुनाच्या दुर्लक्षामुळे सदर प्रतिज्ञापत्रांवर न्यायालयाची “दाखल” अशी सही घेण्यात आलेली नाही व त्यांना निशाणी क्रमांक देण्यात आलेला नाही. सदर बाब वादी व त्यांचे वकील यांच्या निदर्शनास दाव्याचे कागदपत्र तपासणीदरम्यान आली आहे.

२. वादीतर्फे पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, सदर दाव्यातील तात्पुरत्या मनाई आदेशाविरुद्ध प्रतिवादीने मा. जिल्हा न्यायालय, पुणे येथे किरकोळ अपील क्र. ५३/२०२० दाखल केले होते, ज्याचा अंतिम निकाल सन २०२४ मध्ये लागून ते अपील फेटाळण्यात आले आहे. सदर आदेशाविरुद्ध कोणतेही पुढील अपील दाखल करण्यात आलेले नाही. सध्या सदर दावा पुराव्याच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे वादीतर्फे दाखल केलेली प्रतिज्ञापत्रे न्यायालयात नोंदवून त्यांना निशाणी देण्यात यावेत, अशी मागणी सदर अर्जातून करण्यात आली आहे.

३. प्रतिवादीच्या वकिलांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे त्यांच्या साक्षी न घेता निशाणी देता येत नाहीत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रे केवळ नोंदीसाठी स्वीकारण्यात यावीत, मात्र त्यांना

निशाणी देऊ नये, अशी विनंती करण्यात आली आहे.

४. दोन्ही बाजूंच्या युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत दावा व अर्जाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने सदर प्रतिज्ञापत्रे प्रत्यक्षात दिनांक ०३/०३/२०२० रोजी दाखल केली आहेत. केवळ कारकुनाच्या लेखनिक त्रुटीमुळे त्यांना निशाणी क्रमांक देण्यात आलेला नाही. सध्या दावा पुराव्याच्या स्टेजवर असल्याने या प्रतिज्ञापत्रांना निशाणी देणे केवळ नोंद नियमित करण्यासाठी आवश्यक आहे. कायद्याच्या प्रस्थापित तत्त्वानुसार असे आढळते की एखाद्या कागदपत्रास निशाणी देणे म्हणजे त्यातील मजकूर सिद्ध झाल्याचे समजले जात नाही. त्याचा पुरावा व मूल्य साक्षीदरम्यान तपासले जाईल. त्यामुळे सदर प्रतिज्ञापत्रांना निशाणी देणे प्रतिवादीच्या हक्कांवर कोणताही प्रतिकूल परिणाम घडवणार नाही. नागरी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ अंतर्गत न्यायालयास न्यायनिष्ठतेच्या दृष्टीने आवश्यक आदेश देण्याचा अधिकार आहे. येथे झालेली त्रुटी ही केवळ लेखनिक व प्रक्रियात्मक असल्याने, ती दुरुस्त करून प्रतिज्ञापत्रांना योग्यप्रकारे निशाणी देणे न्यायोचित ठरेल. करीता पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. निशाणी क्र. ४४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने दिनांक ०३/०३/२०२० रोजी दाखल केलेली साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे प्रस्तुत दाव्याच्या दस्तांमध्ये दाखल करून त्यांना निशाणी (Exhibit) क्रमांक देण्यात यावेत.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

JADHAV MEENA WAMAN
Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2025.10.10 17:21:46 +0530

**भोर** **( मीना वामन जाधव)**

**दिनांकः १०/१०/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, भोर .**

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P. D. F. file order are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Hon'ble Smt. Meena W. Jadhav<br>C.J.J.D. & J.M.F.C., Bhor, Pune |
| Name of the Steno | :- | M. S. Kondhare L.G. |
| Date of Order | :- | 10/10/2025 |
| Signed by P.O. | :- | 10/10/2025 |
| Order uploaded on | :- | 10/10/2025 |